विवेकानंद कॉलेज
कोल्हापूर



“ ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार ”

शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे

## विवेकानंद कॉलेज, (स्वायत्त) कोल्हापूर

## प्रकल्पाचे नांव -

# “ खारवेलचा हाथीगुंफा प्रस्तरलेख ”

इतिहास विभाग

सन :- २०१८-२०१९

मार्गदर्शकांची नावे :- १. डॉ. मंजुश्री घोरपडे

२. डॉ. सिदधार्थ कुट्टीमनी.

विद्यार्थिनींची नावे :-

१. कु. चैतंन्या राजाराम टोमके

२. कु. सायली सागर परदेशी

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

# अणुक्रमणिका


१. प्रतिज्ञापत्र

२. प्रस्तावना

३. उद्दिष्टये

४. गृहितके

५. प्रकरण

६. संदर्भग्रंथ


VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# प्रतिज्ञापत्र

आम्ही बी.ए. भाग तीन मधील इतिहास विभागातील विद्यार्थीनी " खारवेलचा हाथीगुंफा प्रस्तरलेख " या विषयावरील पुढील प्रकल्प अहवाल सादर करत आहे.

या प्रकल्पात लिपी, वर्णव्यवस्था, भाषा, कालनिर्देश, स्थलनिर्देश , इ. ऐतिहासिक महत्त्व इ. बाजुंचा आढावा या प्रकल्पात सादर करण्याचा प्रयत्न करत आहे.

तसेच या प्रकल्पाचा माध्यमातुन प्रस्तरलेख ची माहिती संदर्भग्रंथाच्या आधारे देण्याचा प्रयत्न करत आहे.

| नाव | रोल नंबर | सही |
|---|---|---|
| १. चैतन्या राजाराम टोमके | ५७२९ | Tomake. |
| २. सायली सागर परदेशी | 5634 | [signature] |

for HOD
विभाग प्रमुख,
इतिहास विभाग,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous)
ESTD JUNE 1964

# उद्दिष्टये

१. खारवेलचा हाथीगुंफा प्रस्तरलेख याच्या लिपीच्या अभ्यास करणे.

२. खारवेलच्या हाथीगुंफा प्रस्तरलेख याच्या वर्णव्यवस्थेचा अभ्यास करणे.

३. खारवेलचा हाथीगुंफा प्रस्तरलेख याच्या भाषेचा अभ्यास करणे.

४. खारवेलचा हाथीगुंफा प्रस्तरलेख याच्या कालनिर्देशचा अभ्यास करणे.

५. खारवेलचा हाथीगुंफा प्रस्तरलेख याच्या स्थलनिर्देशचा अभ्यास करणे

६. खारवेलचा हाथीगुंफा प्रस्तरलेख याच्या विषयाच्या अभ्यास करणे

७. खारवेलचा हाथीगुंफा प्रस्तरलेख याच्या ऐतिहासीक महत्व याचा अभ्यास करणे.

८. खारवेलचा हाथीगुंफा प्रस्तरलेख याच्या भाषांतराचा अभ्यास करणे.

# गृहितके

१. खारवेलचा हाथीगुंफा प्रस्तरलेखाच्या भाषा व लिपीचा अभ्यास करणे

२. खारवेलचा हाथीगुंफा प्रस्तरलेखातुन त्या काळातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक परिस्थीतीचा अभ्यास करणे.

३. खारवेलचा हाथीगुंफा प्रस्तरलेखतुन ऐतिहासिक महत्व अभ्यासणे

VIVEKANAND COLLEGE KOLHA...
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

# प्रकरण

१. प्रस्तावना

२. लिपी

३. वर्णव्यवस्था

४. भाषा

५. कालनिर्देश

६. स्थलनिर्देश

७. विषय

८. ऐतिहासिक महत्व

९. प्रस्तरलेखाचे वाचन

१०. भाषांतर

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# खारवेलचा हाथीगुंफा प्रस्तरलेख

## प्रस्तावना

हा लेख ओरिसा राज्यात पुरी जिल्हयातील हाथीगुंफा येथील खंडगिरी पर्वतावरील गुहेत आहे. लेखाच्या काही भाग गुहेच्या दर्शनी भागावर व काही भाग गुहेच्या छताच्या आतील भागावर कोरला आहे. या लेखाच्या शोध स्टर्लिंग यांनी इ. १८२५ मध्ये लावला. इ. १८३७ मध्ये किकु यांनी या लेखाची यथादृष्ट प्रत सादर केली. त्यावरुन जेम्स प्रिन्सेप यांनी एशियाटिक रिसर्चेस या नियतकालिकाच्या पंधराव्या खंडात या प्रस्तर लेखावरील संशोधनपर लेख तयार केला. त्यानंतर कनिंगॅहम, भगवान-लाल इंदुजी, व्युल्हर यांनी वाचनाचे निरनिराळे पर्याय सुचविले. जयस्वाल व बॅनर्जी यांनी एलिग्राफिया इंडिका खंड २०, पृष्ठ ७२ मध्ये संयुक्त लेख प्रसिद्ध केला.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# लिपी

लेखाची लिपी ब्राम्ही आहे. तिच्यामध्ये 'अ' 'आ' 'इ' 'ए' 'ओ' हे स्वर आले आहेत. 'ख' हे व्यंजन दोन प्रकारांनी लिहिले असून दुस-या प्रकारच्या 'ख' च्या खाली त्रिकोणाची खुन आहे. 'ग' हे अक्षरही दोन प्रकारांनी लिहिले आहे. मौर्यकालीन कोनयुक्त 'ग' आणि कुषणकालीन रुंद पृष्ठभाग असलेला 'ग' 'त' चे मौर्यकालीन कोनयुक्त व कुषाणकालीन बसकट पृष्ठभाग असलेला 'त' असे दोन प्रकार आढळतात. त्याप्रमाणेच एक विशेष गोष्ट म्हणजे कुषाणकालीन 'म' मात्र आढळुन येत नाही. कुषाणकालीन 'म' 'महाराज' आणि 'महामेघवाहन' या शब्दात आढळुन येतो. या सर्वसामान्य स्वरुपातील अक्षरातील उभ्या दंडाची उंची कमी होण्यापुर्वी आणि अक्षरातील कोन येण्यापुर्वी हा लेख लिहिला असावा असे दिसते. जयस्वाल यांच्या मते या लेखाचा काल इ.पु. दुस-या शतकापुर्वी जाणार नाही. जास्तीत जास्त याचा काळ इ. पु. पहिल्या शतकाच्या अखेरीस आणता येईल.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# वर्णव्यवस्था

१.या लेखात जोडाक्षरे जवळजवळ नाहीत. 'कण्हबेण्णा' 'बम्हणानाम्' 'विनिश्चितो' हे तीनच त्यास अपवाद आहेत.

२. अनुस्वाराऐवजी लेखात परसवर्णाचा उपयोग केला आहे. संबंध लेख बहुधा तीन लेखकांनी लिहिला आहे. त्यामुळे अक्षराच्या धाटनीत फरक पडला आहे. लेखाचा पहिला भाग गुळगुळीत केलेल्या दगडावर काळजीपुर्वक लिहिला आहे. परंतु चौथ्या -पाचव्या आळीनंतरचा मजकुर खडबडीत दगडावर लिहिला आहे. सरतेशवटी तर दगडावर छिन्नीचाही खुणा दिसुन येतात. त्यामुळे लेख वाचणे दुबौध झाले आहे. दोन ठिकाणी अक्षरे गळली आहेत. उदा. ओळ चौदा 'अर्हंयते' या शब्दातील 'य' लिहिला नाही म्हणुन तो चौदाव्या आणि पंधराव्या ओळीमध्ये लिहिला आहे. त्याचे चौदाव्या ओळीतील स्थान काकपदाने दर्शविले आहे.

लेखाच्या सुरवातीस दोन खुणा आहेत. पहिली खुण राजमुगुटाप्रमाणे दिसते. दुसरी खुण स्वस्तिकाची असुन लेखाच्या शेवटी वेदिकेमध्ये असलेल्या झाडाचे चिन्ह आहे. विशेष म्हणजे वाक्य संपल्यानंतर जागा सोडली आहे.

KANAND COLLEGE KOLHAPU
ESTD JUNE 1964
(Autonomous)

# भाषा :-

या प्रस्तरलेखाची भाषा प्राकृत असुन तिच्यावर संस्कृतची छाप आहे.

उदा- 'महामेघवाहनेन'

'वंदापयाति'

प्रस्तरलेख बहुधा गुजरात किंवा महाराष्ट्रातील जैन साधुन रचला असावा असा जयस्वाल यांचा तर्क आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

# कालनिर्देश :-

या लेखात कालनिर्देश नाही. [illegible] राज्यवर्षाचा [illegible] उल्लेख नाही त्यामुळे कोणत्या काळाशी संबंध आहे. [illegible] लेखामध्ये समकालीन राजांची नावे आल्यामुळे या लेखाचा [illegible] काळ [illegible] केला. [illegible] [illegible] [illegible] यांच्या नंतरच्या ओळीत 'दुर्भिक्षाचा' असा उल्लेख आहे.

# कालनिर्देश :-

या लेखात कालनिर्देश नाही. राजा खारवेल राज्यावर आल्यानंतर प्रत्येक वर्षी त्याने केलेल्या कार्याची नोंद आहे. याशिवाय लेखामध्ये समकालीन राजांची नावे आल्यामुळे या लेखाचा सर्वसाधारणपणे काल ठरविता येतो. भगवान लाल इंदुजी यांच्या मते सोळाव्या ओळीत 'मुश्चिकाल' असा उल्लेख आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous)
ESTD JUNE 1964

# स्थलनिर्देश :-

कलिंगनगरी - ओडिसा राज्यातील गंजाम जिल्हयातील कलिंगपट्टणम

कण्हबेण्ला - महाराष्ट्रातील कृष्णा नदी, मिरशी यांच्यामते नागपुरजवळील कन्हान व वैनगंगा नदया.

मुसिकनगर - कदाचित गोवळकोंडयाजवळील मुसी नाव

तनसुलीयवाट - या गावाचा शोध लागत नाही.

वाजिराघर - या गावाचा उल्लेख कुलोत्तुग पहिला चोळ किंवा चालुक्य द्वितीय राजेंद्र याच्या लेखात आहे. रावबहाद्दर हिरालाल यांच्या मते वजिराघर म्हणजे चांदा जिल्हयातील वैरागड आहे.

गोरधगिरी - गया जिल्हयातील बराबर टेकडया

राजग्रह - विहार राज्यातील सध्याचे राजगीर

मधुर - मथुरा

पिथुंड - टॉलेमीने पिथुंट या गावाचा उल्लेख केला आहे. परंतु आता या गावाचा शोध लागत नाही.

प्रमिर - द्रमिड, द्रविड तामिळनाडुचा उत्तर भाग

मगध - बिहार राज्य

अंग - भागलपुर आणि मोंधीर जिल्हे.

पंडराज - मदुरेपासुन कन्यापकुमारीपर्यंताचा प्रदेश

VIVEKANAND COLLEGE
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

रथिक - खानदेश, नाशिक, नगर, पुणे येथील रहिवाशी

भोजक - विदर्भातील लोक

टोर - पुरणामध्ये इलेच्या वंशजांना टोर म्हटले आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964

# विषय

प्रस्तुत लेखात खारवेल राजा राज्यावर आल्यानंतर त्याने प्रत्येक वर्षी कोणकोणती कार्ये केली याचा तपशील आहे. लेखाच्या सुरुवातीलस अर्हत् आणि सिद्धांना नमन आहे. खारवेल राजा टोल वंशातील चेदी राजघराण्यातील श्रेष्ठ राजा महामेघवाहन याचा वंशज असुन कलिंग देशाचा सम्राट होता. पुरुषश्रेष्ठाच्या सर्व उत्तम लक्षणांनी तो युक्त असुन सर्वगुणसंपन्न होता. पंधरा वर्षे खेळ खेळल्यामुळे त्याचे शरीर सुदंदर आणि पुष्टझाले होते. त्यानंतर त्याने लेखविदया, गणित चलन, अर्थशास्त्र, धार्मिक आणि नगरी कायदे व इतर सर्व कलांचा अभ्यास करुन त्यात प्राविण्य मिळविले. नउ वर्षे त्याने युवराज पड संभाळुन कारभार केला. चोविसाव्या वर्षापासुन त्यने ऋग्वेदातील वेन राजाप्रामणेन दिगिवजयास सुरवात केली त्यानंतर त्यास राज्यभिषेक झाला.

राज्यावर आल्यानंतर पहिल्या वर्षी राजधानीतील वादळाने पडलेल्या इमारती, तटबंदी आणि प्रवेशद्वारे त्याने दुरुस्त केली. खिबिरऋषीताल या तलावाला दुरुस्तीसाठी पस्तीस लाख कार्षापण खर्च केले.

दुसरे वर्षी त्याने चतुरंग सेना, पदाती, रथ, हत्ती घोडे, पश्चिमेस पाठवून सातकर्णीचा पराभव केला. कृष्णा, वेण्णा या नदयांचा भुप्रदशे अंकीत केला.

तिस-या वर्ष त्याने संगीत परिषद भरविली. नृत्य, गायन, तंतुवादयावादन यास प्रवीण असलेल्या यात लोकांना त्याने आमंत्रण दिले व मोठा अत्सव साजरा केला.

चौथे वर्षी कलाकारांसाठी वसाहत स्थापन केली. रथिक आणि भोजक याचा पराभव केला.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

पाचवे वर्षी तनसुलीयवाट येथुन राजधनीपर्यंत कालवा खणुन आणला.

सातवे वर्षी त्यचे पत्नीस मातृपद प्रात्प झाले.

आठवे वर्षी बोधगयेवजळ बराबर येथे सैन्य पाठविले. राजगृहाजवळ यवनराजा डिमिन (इंडो-ग्रीक राजा डिमिद्रियस) आल्याने कळल्यावर राजाने त्यास मथुरेपर्यंत मागे हटविले.

नवव्या वर्षी साम, दाम, दंड या नितीचा अवलंब करुन युदधासाठी प्रस्थान ठेवले.

दहाव्या वर्षी जिंकलेल्या देशात मणी-रत्नांचा खजिना लुटला आणि पिथुंड नगरीवर गाढवाचा नांगर फिरविला.

बाराव्या वर्षी आर्यावर्तातील राजांवर स्वा-या केल्या आणि मगध राजाच्या सुसंग प्रसादामध्ये खारवेल राजाने प्रवेश केला. मगधचा राजा बृहस्पती मित्र याचा संपुर्ण पाडाव केला.

तेराव्या वर्षी एकशे तेरा वर्षे राजयाला सतत त्रास देणा-या द्रविड देशीयांचा पराभव केला. या नंतरच्या लेखातील मजकुराबाबत मात्र जयस्वाल, भगवानलाल इंदुजी, दिनेशचंदु सरकार इ. संशोधकांचे निरनिराळे वाचन असल्याने अर्थातच त्याचे संशोधन निर्णय परस्पर भिन्न आहे.

खारवेलने नंदराजाने नेलेली जिन मुर्ती अंग आणि मगधाचा पराभव करुन आणली. राजधानीमध्ये आतील बाजुस भित्तीचित्रे असलेली सुंदर गोपुरे उभरली, व शिरयुत प्रासाद बांधले. तेराव्या वर्षी महावीराने जेथे जैन धर्माची शिकवण दिली तेथे जैन साधुना श्वेतवस्त्रे दान दिली या कुमारी पर्वतावस्थ खरवेलने भिक्षुसाठी गुहा खोदविल्या यापुढे जयस्वाल यांनी सिंहपथाची रानी सिंधुळा हिच्यासाठी राजप्रसाद बांधला अशी एक घटना नमुद केली आहे.

COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

कुमारी पर्ववावरच खारवेलने स्तंभ उभारले. त्यासाठी पाच लाख मुद्रा खर्च केलया. लेखाच्या शेवटी राजाने सर्वपार्षदपुजक सर्वदवायतन संस्कारकारक, गुणविषेष त्याने सर्व पुजास्थानांची दुरुस्ती केली ही गोष्ट स्पष्ट होते.

ESTD JUNE 1964 ... AND COLLEGE KOLHAPUR (Autonomous)

# ऐतिहासिक महत्व -

प्राचीन भारतीय इतिहासमध्ये खारवेल राजाचा हा प्रस्तर लेख मौलिक आहे. खारवेल सातवाहन सम्राट श्रीसातकर्णी याचा समकालीन होता. खारवेलाने राज्यावर भोजक यांचाही पराभव केला, यावरुन महाराष्ट्राचा उत्तर भाग खारवेलच्या अंकित होता हे स्पष्ट होते

सहाव्या ओळीतील नंदराजाचा मौर्यकाल १०३ या वर्षी खारवेलाने तनसुलीयवाटापसून ‘खिबिरऋषीताल’ हा कालवा आणला हा उल्लेख अतिशय महत्वपुर्णआहे. १०३ नंदकाल म्हणजे इ.पु ३५५ होय. या वर्षी तनसुलीयवाट हा कालवा प्रथम खणला गेलाा. या कालगणनेनुसार आपण शेवटच्या नंदराजाचा इ.पु. ३२५ हा काल घेतला तर इ.पु ३२५-१०३ इ. पु २२२ हा खारवेलचा काल येईल.

या लेखामध्ये समकालीन राजांचा उल्लेख असल्यामुळे सबळ माहिती आली आहे. बहसतिमित या राजाचा उल्लेख आला आहे. बृहस्पतिमित्र हा शुंग वंशातील पाचवा राजा होता. तो खारवेलाचा समकालीन असल्यामुळे त्याचा काल इ.पु. १८८ त इ.पु १२५ असावा. शुंग राघराण्याच्या वंशावळीमध्ये मात्र या आढ मुलांना त्याने सारखे अधिकार दिले असे सांगिते आहे. पुण्यमित्राने आपल्या राज्याची वाटणी केली वेव्हा अग्निमित्र हा विदेशेचा राजा झाला. पुण्यमित्राचा सहावा मुलगा कोसल देशाचा राजा झाला, हे अयोध्येच्या लेखावरुन स्पष्ट आहे. वायुपुराणामध्ये पुण्यमित्रानंतर आग्निमित्राच्या मुलाची नावे दिली आहेत. परंतु अग्निमित्राचे आणि बृहस्पतिमित्राचेही नाव नाही. बाराव्या ओळीमध्ये पाटलीपुत्र येथील मौर्य राजांच्या सुगंगीय या राजप्रासादापर्यंत खारवेल राजा पोचला असा उल्लेख आहे. मुद्राराक्षस या नाटकातील तिस-या अंकात या राजप्रासादाच्य उल्लेखआहे.

ANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

खारवेलाच्या या लेखातील सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे त्याचे इंडोग्रीक राजा डिमिट्रियस याच्याशी समकालीनत्व डिमिट्रियस हा पहिला युथिडिमॉस याचा मुलगा याने भारतावर विजय मिळविला. मध्य आशियातील पश्चिम भागात बॅक्ट्रिया येथे ग्रीकांचे राज्य होते. या राज्याचा विस्तार करण्याचे श्रेय डिमिट्रियस अणि मिनॅडर यांना आहे. ग्रीक इतिहासकार जस्टीसने त्यास भारतीय राजा म्हटले आहे. डिमिट्रियसने आपल्या तांब्याच्या नाण्यांवर खरोष्टी लिपीचा वापर केला असून अपराजित ही उपाधी घेतली होती. यावरुन त्याने भारताचा काही भाग काबीज केला होता ही गोष्ट निश्चयपणे सिदध होते. गार्गी सहिंतेच्या युगपुराणामध्ये डिमिट्रियसच्या पाटलीपूत्रावरील स्वारीचा उल्लेख असुन साकेत, मथुरा व पांचाल देशचा पराभव करुन ग्रीक लोक पाटलीपुत्राला आले व त्यांनी लढाई गेली असे सांगितले आहे. डिमिट्रियसचे नाव त्यामध्ये धर्ममित्र आहे. डिमिट्रियसचा काळ सर्वसाधारणपणे इ.पु दुस-या शतकाचा प्रथमार्ध धरला जातो. या सुकारासच बॅक्ट्रिया आणि अफगाणिस्तानमध्ये डिमिट्रियस व त्याचे भाउबंद यामध्ये मोठे यादवी युदध झाले.

यावरुन खारवेलचा काळही इ.पु दुस-या शतकाचा प्रथमार्ध होता हे स्पष्ट होते असे जयस्वाल यांचे मत आहे

खारवेल राजाने राज्यभिषेकानंतर तेराव्या वर्षी कुमारपर्वतावर जैन भिक्षुंची परिषद भरविली. जैन दंतकथेवरुन चंद्रगुप्त मौर्याने बारा वर्षे पडलेला दुष्काळ संपल्यानंतर जैन परिषदरा भरविली होती असे समजते. खारवेलाने नंद राजाने नेलेली जिनमुर्ती जाणवुन तिची प्रतिष्ठापना केली. भारतीय इतिहासात मुर्तीचा हा सर्वात प्राचीन प्रस्तरलेखीय पुरावा आहे.

या प्रस्तरलेखातील खारवेलच्या लोकोपयोगी कार्यामुळे तत्कालीन वास्तुविषकय महत्वाची माहिती मिळते. राजाने राजधानामध्ये उदयाने, तलाव, टाकी बांधली. तनसुलीयवाटापासून राजधानीपर्यंत कालवा आणला. हस्तिशास्त्र, गोशाळा,

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

तटबंध, गोपुरे, शिखरयुक्तप्रासाद, रत्नजडीत स्तंभ इ. गोष्टी तत्कालीन प्रगत संगीत परिषद भरविली. नृत्य, गायन व तुतुवादयवादन यामध्ये प्रवीण असलेल्या कलाकारांना आमंत्रण देवुन मोठा संगीतसमारंभ साजरा केला. कलाकारांची वसाहत स्थापन केली. कुमारीपर्वतावार जैन भिक्षुंना चीनमधील रेशमी वस्त्रे दिली. भारताचा चीनशी त्या काळात व्यापार चालु होता हे यावरुन स्पष्ट होते.

ESTD JUNE 1964

# टीपा

चेनिराजवस - प्राचीन भारतीय इतिहासात चेदीवंश विख्यात होता. सोळा महाजनपदामध्ये चेदी राज्य अंतर्भुत होते. नंतरच्या काळात चेदी वंशातील कलचुरी डाहलाचे हे हेय राजे प्रसिदध्द होते.

महामेघवाहन - खारवेल हा महामेघवाहनाच्या वंशज होता.

सातकर्णी - या प्रस्तरलेखात उल्लेख असलेला सातकर्णी म्हणजे सातवाहन वंशातील तिसरा राजा श्रीसातकर्णी होय. सातवाहन समाश्री नागणिका ही याची पत्नी.

यवनराज डिमिन - इंडोग्रीक राजा डिमिट्रियस

एहयनिमित - शुंगवंशीय राजा बृहस्पतिमित्र

सिंधुळा - काशीप्रसाद जयस्वाल यांनी राणीचे नाव 'सिंधुळा' असे वाचले होते.

राजर्षी क्युकुल - पुराणामध्ये चेदीवंशीय राजा व याचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणे हरिवंशपुराणातही या राजाचा उल्लेख आहे.

नंदराज - काशीप्रसाद जयस्वाल या लेखाच्या सहाव्या आणि दहाव्या ओळीत नंदराज असे वाचन करतात. परंतु इतर संशोधकांच्या मते फक्त सहाव्या ओळीतच नंदराजाचा उल्लेख आहे.

खिबीर-इषि-ताल - हे राजधातीमधील बहुधा तलावाचे नाव असावे.

वेनराज - काशीप्रसाद जयस्वाल वेनराज असे वाचन करतात. त्यांच्या मते हा उल्लेख ब्राम्हण वाङःमयातील पृथपुत्र वेन याचा आहे. वेन दिग्विजयी राजा होता. त्याचा उल्लेख उदयपुराणात आला आहे. खाश्वेलाची वेन राजाशी तुलना केली आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

युवराजा - भागवतपुराण आणि विष्णुराणामध्ये अवराजाचा उल्लेख आहे. बहुधा तोच राजा या लेखात अपेक्षित असावा. टॉलेमी ने कृष्णा नदीच्या काठी :अवर्णी लोकांचा उल्लेख केला आहे. बहुधा ते लोक आंध्रप्रदेशातच रहात असावेत.

लेख - राजकीय पत्रव्यवहार - कौटिल्याचा अर्थशास्त्रात या विषयावर चर्चा आली आहे. कौटिल्य अर्थशास्त्र ३.१.१८

रुप - बुद्ध घोषाने गहावग्गामध्ये याची चर्चा केली आहे. अर्थशास्त्रात ‘रुप-दर्शक’ म्हणजे नानी तपासनारा या अर्थी हा शब्द आला आहे. याशिवाय नामरुप म्हणजे तांब्याची नाणी कौटिल्य अर्थशास्त्र २.१२.२४

गणना - हिशेब कौटिल्य अर्थशास्त्र २.७.१०

ववहार - नागरी विधी कायदे ३.२.१

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# वाचन

ओळ १ :- राजमुकुट आणि स्वस्तिकाचे चिन्ह

नमो अरहेतानं । नमो सव

सिधानं ॥ ऐरेण महाराजेन महामेघवाहनेन चेमिराज व – स-वधनेन-पसथ-

सुभ-लेखनेन चतुरंतलुठ ण गुण- उपितेन कलिंगाधिपतिना सिरि-खारवेलेन

ओळ २:- पं दरस-वसानि सीरि-कत्रर सरिर-वता किजा कुमार-किडिता ॥ ततो लेख-

रुप-गुणना-ववहार-विधी विसारदेव सव- विजावदानेन नव - वसानि योवरज प सासिनं ॥ संपुण - चतुसीसति-वसो तदानि वधमान-सेसयो-वेना-भिविजयो ततिये.

ओळ ३ :- कलिंगराज - वसे पुरिसयुगे महाराजाभिसेचन पापुनामि ॥ अभिसितमतो च पधमे वसे वात - विहत - गोपुर - पाकार - निवेसन पटिसंरवाषति कलिंगनगरिखिती रं । सितल तडाम-पडियोच बंधापयाति सवुयान - प टि संथपनंच

ओळ ४ :- कारयानी पनति सि १ साहि सत- सहसेहि पकतियो च रंजयाति ॥ दुनिये च वसे अचितयिका सातकंनि पछिम - दिसं हय - गण - नर - रध -बहुलं दंड पठ / ययति । कन्हर्बेणा - गताय च सेनाथ वितासिति असिकनगर ॥ ततिये पुन वसे

ओळ ५ :- गंधव - वेध - बुधो दय - नत -गीत-वादित-संदसनाहि उसव-समाज-कारापनाहि च कीडापथति नगरी ॥ तथा चवुये वसो विजाधराधिवासे अहतपुवं कलिंग १ - पुव - राज- निवेसिंत...वितध म कु ट ....च निश्चित छत १....

ओळ ६ :- भिंगारे हि त रतन - सपतेचे सव - रठिक-भोजले पावे बंवाययति ।। पंचमे च दानी वसे नंदराज - नि - वस - सत -उतो घा हिंत तनसुलिय - वाटा पणाडिं नगरं पवेस य ति सो... १ अ - भिसितो च छडे वसे - राजसेय संदंसयंतो सवकर - वज

ओळ ७ :- अनुगह - अनेकाति सत - सहसानि विसजनि पोर - जानपदं ११ सतमं च वसं पसा - सतो वजिरघर...स मतुकपद कु....म १....अठमे च वसे महता सेन ११ गोरधगिरें

ओळ ८ :- घातापयिता राजगह उपपीडपयति १ एतित ११ च कमपदान स – नादेन... सेनवाहने विपुनुचितं मधुर अपयातो यवनरा ज डिमित १ यछति पलव

ओळ ९ :- कपरुखे हय - गज - रथ - सह यति सव - घरावास ....सव - गहण च कारयितु ब्रम्हणांन ज य - परिहारं ददाति १ - अरहत - नवमे च वसे

ओळ १० :- महाविजय - पासादं करयति अठतिसाय सतसहसेहि ११ दसमे च वसे दंड - संधी - सा ममयो १ - भरधवस - पठा १ - नं मह जयन १ - कारापयाति ११ - एकादसमे च वसे - प - ा - यातानं च म - ति- रतनामि उपलभते १

ओळ ११ :- पुवं राज - निवेसित पीथुंड गदभ नंगलेत काययित १ जन प - दभवनं च तेरस - वस - सत - कसं भि . - दति त्रामिर - दह १ - संधांत १ - बारसमे च वसे .... सह - सेहि वितासयति उपरापध राजानी...

ओळ १२ :- म १ गधांन च विपुल भयं जतेतो हयसं गंगाय पायथति १ - म - ग - घ - च राजानं बहसतिमितं पादे - वंदापयाति । - नंदराजनीत च का लि - ग - जिनं संतिवेस ...अंग - मगध - वसुं च नयामि ११

ओळ १३ :- क - तु - जठर लखिल - गोपु शनि सिहसाठी निवोसयमि सत - विसिकनं - प - रि - हारेहि १ - अभुतमछरिंय च हथी निवा स परिहर - हय - हथि -

ESTD JUNE 1964 ... COLLEGE KOLHAPUR (Autonomous)

रतन - मनिक - पंडराजा ....मुं - त - मनि रतनति आहरापयाति इध सत - सहसाति-...

ओळ १४ :- म १ गधांन च विपुल भयं जतेतो हयसं गंगाय पायथति १ - म - ग - घ - च राजानं बहसतिमितं पादे - वंदापयाति । - नंदराजनीत च का लि - ग - जिनं संतिवेस ...अंग - मगध - वसुं च नयामि ११

ओळ १५ :- सकत - समण सुविहितान च सव- दिसानं ज नि - नं १ - तपासि - इ- सि - त - संधियनं - अरहतिनिसीदिया-समीपे पाभारे वराकार - समुया-पिताहि-अनेक योजनाहिताहि....सिलाहि

ओळ १६ :- धतरे च-वेडुरिय - गभे थंभे पतिढापयति पान-तरीय सत-सहसे ११ मु - खि- य कल-वेछिनं च चोच -ठि - अंम संतिक – राजा स भिच्छु-राजा धम- राजा पसे तो-सुनं-तो अनुभव तो-कलनानि.

ओळ १७ :- म १ गधांन च विपुल भयं जतेतो हयसं गंगाय पायथति १ - म - ग - घ - च राजानं बहसतिमितं पादे - वंदापयाति । - नंदराजनीत च का लि - ग - जिनं संतिवेस ...अंग - मगध - वसुं च नयामि ११

...EKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

# भाषांतर

१-३ अर्हतांना नमस्कार असो. सर्वसिध्द पुरुषांना नमस्कार असो. महामेघवाहन (कुळातील) चेदीवंशाची बुद्धी करणारा, ज्याच्या गुणांची कीर्ती चारी दिशांना पसरली आहे. जो उत्तम आणि शुभ लक्षनांनी युक्त आहे. जो कलिंगाचा अधिपती आहे. अशा आर्य महाराज खारवेलाने, तांबुस गो-या देहाने, पंधरावर्षापर्यंत बाल-सहश क्रीडा केली नंतर राजकीय पत्रव्यवहार, नाणकशास्त्र, हिशेब, कायदा, धर्मशास्त्र यामध्ये निष्णात होवुन सर्व विदयांचे अध्ययन करुन युवराज म्हणुन नवु वर्षापर्यंत अधिकार गाजवला. चोवीस वर्षे पुर्ण झाल्यानंतर ज्याचा वेन राजाप्रमाणे बालपणापासून विजय होत गेला ओ व कलिंग वंशाचा तिसरा राजा पंचविसाव्या वर्षी वाताहत झालेल्या गोपरांची वटबंदीची व वसतिस्थांनीची दुरुस्ती केली. कलिंग नगरातील खिबिरऋषी नामक तळयाची पाळी बांधली. तसेच इतर शीतल तळयांची पाळी बाधली. सर्व उदयानांची पुन्हा प्रतिष्ठापना केली व त्याप्रीत्यर्थ पस्तीस लक्ष खर्च केले आणि प्रजाननानां संतुष्ठ केले.

दुस-या वर्षी सातकर्णीचा मुलहिजा न करता पश्चिम दिशेस अश्व, गज, सैनिक व रथ यांनी गजबजलेले सैन्य पाठविले आणि ते सैन्य कृष्ठवेण्णापर्यंत पोचताच ऋष्किनगराची तारांबळ उडाली.

तिस-या वर्षी गांधर्व - वेदामध्ये निपुन असलेल्या त्याने मुल्लयुद्ध , नृत्य,गायन, वादन उत्सव आणि नाटक मंडळे भरवुन नगरीस क्रीडामय ठेवले. चौथ्या वर्षी कलिंगाच्या पुर्वी च्या राजे लोकांनी वसवलेली दियाधरांची निवासस्थाने, जी त्यापुर्वी हल्ल्यापासुन बचावलेली होती....ज्याचा राजमुकुट व्यर्थ ठरुन व ज्यांनी छत्रचामरे टाकुन दिली आहेत ज्यांची रत्ने व संपत्ती हिरावुन घेतली आहे. रथिक आणि भोजक यांना पाया पडायला लावले.

६-७ पाचव्या वर्षी नंदराजाने एकशे तीन वर्षापुर्वी बांधलेल्या तनसुलीय वाट नावाचा कालवा राजधानीत आणुन सोडला.

सहाव्या वर्षी वज्रगृहाच्या यज्ञ करुन पुन्हा राज्याभिषेक करयुन आपले ऐश्वर्य प्रकट करुन शहरातील, खेडयातील सर्व जातीच्या व वर्णाच्या प्रजेवर अनुग्रह करुन लाखो मुद्रांची सुट दिली.

सातव्या वर्षी वज्रगृहाच्या राणीला मातृपद प्राप्त झाले. आठव्या वर्षी गौरव पर्वतावर हल्ला चढवुन राजग्रहावर दबाव आणला.

या विक्रमाच्या वार्तानिनादानेच यवन राजा डिमित आपल्या सैन्याची सुटका करुन घेण्यासाठी मथुरेस पळुन गेला. कल्पवृक्षाप्रामणे हत्ती, रथ, सारस्यासह वर्तमान, सर्वत्र राहण्याची घरे व वस्तुची प्राप्ती व्हावी एदर्श ब्राम्हणांना जयाप्रीत्यर्थ करांची सुट दिली.

नवव्या वर्षी अडतीस लक्ष खर्च करुन राजघराण्याच्या निवासासाठी महाविजय नावाचा प्रासाद बांधला.

दहाव्या वर्षी साम, दाम, दंड इ. उपायांचा अवलंब करुन भारतवर्षाकडे मोर्चा वळला.

अकराव्या वर्षी पिटाळुन लावलेल्या शत्रुंच्या जड जवाहिरांची लुट मिळवली... पुर्वीच्या राजानी वसवलेले पियुण्ड बाराजाचे शहर शहरावर गाढवाचा नांगर फिरवला. एकशे तेरा प्रजेला भितीदायक वाटकारी तिमिर देशाची एकजुट नष्ट केली.

बाराव्या वर्षी उत्तरापथाच्या राजांना हजारोंनी भंडावुन सोडले. मागधांना अतिशय भयभीत करुन आपले हत्ती, घोडे सुगंगा नावांच्या राजवाडयात घुसवले. यांना गंगेचे पानी पाजविले. आणि मगधाचा राजा बृहस्पतिमित्र याला आपल्या चरणावर लोटांगण ।घलायला लावले. नंदराजाने नेलेली कलिंगाची जिनमुर्ती.....पुन्हा

ESTD JUNE 1964 (Autonomous)

स्थापीत केली... अंग-मगधाची संपत्ती लुटुन नेली. घराण्यातील जवाहिराच्या रक्षकांसह ज्यांची विपुल उदरे आहेतअशी गोपुरे आणि शिखरे वसवलीआणि करांची माफी देवुन हजारो गवंडयांची वस्ती करविली. अद्‌भुत आणि आश्चर्यकारक असा हत्तीखाना बांधला. पांज्य राजाकडुन अश्व, हत्ती, रत्ने आणि माणके मोती, हिरे लाखांच्या संस्थेने आणवली...राहणाऱ्यांना वश केले.

तेराव्यावर्षी विजय चक्र चांगल्या प्रकारे फिरु लागले वर कुमारी पर्वतावर निशश्रित झालेल्या अर्हत् वर्षाकालीन निवासासाठी राजाश्रयाने गुराजा करणा-यांना रेशमी वस्त्रे वल्कले व्रताचे उदयापन करणा-यांना क्लेशनिवारणार्थ पावसाळयात निवारा शोधणा-यांना पुजा प्रेमी आणि उपासक अशा खारवेल्याने जीव-देहाची प्राप्ती होण्यासाठी औदार्याने यावज्जीव वस्तीसाठी खोदविले.

सरकारांच्या मते - श्रमकांचा सत्कार करणा-या खारवेलाने सुस्थापित अशा सर्व दिशांकडन ज्ञानी, तपस्वी, ऋषी आति संघीय लोकांना यांचे संमेलन अर्हत् लोकांचे वर्षास्थाना जवळ पाभार येथे भरविले.

अनेक योजने दुरच्या देशांतुन आणलेले सुडौल बांध्याचे वैदर्यमाणियुक्त असे खाकीतन आणलेली रत्ने. सिंळपथ राणी सिंधुळा ब-याचसाठी निवासस्थान बांधले.

जयस्वालांच्या मते - पातालक...पंचाहत्तर लक्ष खर्चेन बदुर्यमनिखचित असे चार स्तंभ सात अंगे असलेली चौसष्ट अक्षरे.

सरकारांच्या मते पंचाहत्तर लक्ष खर्चून चौसष्ट मुख्य कलानिर्मित [मौर्यकालापासुन उध्वस्त झालेले.] शात्नकाली वाजवण्याचे वादय तयार केले असा हा कल्याणकारी राजा, समुद्रधीदाता राजा, भिक्षुंचा राजा, धर्माचा राजा, सर्व सुखे ज्ञान, करुन श्रवण, करुन अनुभवनारा, अपार गुणकौशल्य असलेला सर्व पार्षदांचे पुजन करणारा, सर्व देवळांचा जीर्णाध्दार करणारा ज्याच्या रथाला व सैन्याला कोनीही विरोध

...AND COLLEGE K... ESTD JUNE 1964 (Autonomous)

केला. नाही असा चक्रप्रवर्तक आणि चक्रसंरक्षक, चक्रधारी, राजर्षी वसुचा जन्मलेला राजा श्री खारवेल.

# संदर्भ ग्रंथ

१. गोखले शोभना, पुराभिलेखाविदया, दि्वतीयावत्ती, (२००७,) कॉन्टिनेन्टल प्रकाशन.

२. ओझा गौरी शंकर (१९७७), प्राचीन भारतीय लिपी, मुन्शीराम मनोहरलाल पब्लिकेशन नवी दिल्ली.

३. कोलते व्ही.भी(संपादकीय १९८७) महाराष्ट्रातील काही ताम्रपट आणि शिलालेख, महाराष्ट्र साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, पुणे

४. Burgess & Pandit, Eindiragi, Insciription from the care temples of western India, Volume Part.

५. Nagaraju S. – Buddhist Architecture of Western India Agam Kala prakashan, N. Delhi 1981

# धन्यवाद